सकाळ » TODAY
सिंधुदुर्ग, बुधवार, ८ जून २०२२



दोडामार्गः येथे शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताना भाई परमेकर.

# हळबे महाविद्यालयात शिवस्वराज्य दिन

दोडामार्गः येथील हळबे महाविद्यालयात शिवस्वराज्य दिन उत्साहात साजरा केला. नवनिर्माण शिक्षण संस्थेचे सदस्य भाई परमेकर, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष मनोज पार्सेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत उपस्थित होते. विद्यार्थिनी पूजा पाटील हिने पोवाडा सदर करून उपस्थितांची मने जिंकली. श्री. परमेकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्य कर्तृत्वाची माहिती दिली. श्री. पार्सेकर यांनी कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. प्राचार्य सावंत यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धनीती, अठरापगड जातींना एकत्र आणण्याची कला, दूरदृष्टी आदी विविध पैलूंची माहिती दिली. प्रास्ताविक प्रा. डॉ. संजय खडपकर यांनी तर आभार अस्मिता सावंत हिने मानले.